**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप सिताराम देशपांडे
मालोजीनगर, कोळकी, ता.फलटण, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी वर्ग-१,
पंचायत समिती फलटण, ता.फलटण, जि. सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका आरोग्य अधिकारी,
फलटण, ता.फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३९३ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिलीप सिताराम देशपांडे
मालोजीनगर, कोळकी, ता.फलटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी वर्ग-१,
पंचायत समिती फलटण, ता.फलटण, जि. सातारा श्री.वि.लिं.जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका आरोग्य अधिकारी,
फलटण, ता.फलटण, जि.सातारा विद्यमान-डॉ.व्ही.व्ही.पोटे,
तत्कालीन-डॉ.आर.एम.जगदाळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२४.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२.४.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३.५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि.३०.७.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२३.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.५.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सन २००५ ते २००८ अखेरपर्यंत उपजिल्हा रूग्णालय, फलटण यांच्याकडे शासनाकडून उपलब्ध झालेल्या नोटिशीच्या संदर्भात माहिती अनेकदा आपण मागितली होती. परंतु लेखी व तोंडी विनंती वारंवार करूनही व अनेकदा कार्यालयात जाऊनही तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तालुका आरोग्य अधिकारी, फलटण, ता.फलटण, जि.सातारा डॉ.आर.एम.जगदाळे यांनी माहिती दिली नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानंतरही अपुरी माहिती दिली. अपिलीय प्राधिकाऱ्यांना स्मरणपत्र दिल्यानंतर त्यांनी तालुका आरोग्य अधिकाऱ्यांना सक्त ताकीद दिली. नंतर बदलून आलेले जन माहिती अधिकारी तथा तालुका आरोग्य अधिकारी, फलटण, ता.फलटण, जि.सातारा डॉ.व्ही.व्ही.पोटे व अपिलीय प्राधिकारी गटविकास अधिकारी, पंचायत समिती फलटण, ता.फलटण, जि.सातारा श्री.वि.लिं.जाधव यांनीही परिपूर्ण माहिती दिली नाही, त्यामुळे सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.दिलीप सिताराम देशपांडे यांनी केली.

श्री.देशपाडे यांनी मागितलेल्या माहितीची १० हजारांपेक्षा जास्त पाने होत असल्यामुळे माहिती व्यक्तिशः पाहण्यास येण्याचे पत्र त्यांना दिले. त्यानंतर काही वेळा येऊन त्यांनी कागदपत्रे पाहिली. मात्र नेमक्या कोणत्या प्रती हव्यात याची माहिती दिली नाही व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती फलटण, ता.फलटण, जि.सातारा यांच्याकडे अपील केले. श्री.देशपांडे यांना माहितीसाठी होणाऱ्या शुल्काबाबत तोंडी सांगितले असल्याचे त्यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीत मान्य केले. मात्र शुल्क लेखी कळविणे आवश्यक होते, ते न कळविल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा तालुका आरोग्य अधिकारी, फलटण, ता.फलटण, जि.सातारा डॉ.व्ही.व्ही.पोटे यांनी स्वखर्चाने सात दिवसात माहिती द्यावी, असा आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला. त्यानुसार माहिती दिली. मूळ अर्जात मागणी नसलेली आणखी काही माहिती नंतर देऊ केली असता ती श्री.देशपांडे यांनी स्वीकारली नाही व माहिती चुकीची व अपूर्ण असल्याची तक्रार अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केली. त्याबाबतची तपासणी करून ऊर्वरित माहिती श्री.देशपांडे यांना देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती फलटण, ता.फलटण, जि.सातारा यांनी दिले, असे निवेदन विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तालुका आरोग्य अधिकारी, फलटण, ता.फलटण, जि.सातारा डॉ.डी.व्ही.पोटे व डॉ.आर.एम.जगदाळे यांनी आयोगापुढील सुनावणीत केले. ते रास्त असल्याचे प्रतिपादन तत्कालीन व विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती फलटण, ता.फलटण, जि.सातारा श्री.म.शं.घुले व श्री.वि.लिं.जाधव यांनी केले. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी श्री.देशपांडे यांना पुनश्च माहिती देण्यात आली, असेही त्यांनी नमूद केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता श्री.देशपांडे यांना मूळ अर्जानुसार माहिती देण्यात आली. तसेच अधिक तपशीलवारही नंतर देण्यात आली. तथापि माहिती देण्याबाबत व शुल्क आदीसंबंधाने अपीलकर्त्यांना लेखी कळविणे व कार्यवाही काटेकोरपणे करणे आवश्यक आहे, याची समज विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तालुका आरोग्य अधिकारी, फलटण, ता.फलटण, जि.सातारा डॉ.डी.व्ही.पोटे व डॉ.आर.एम.जगदाळे यांना देण्यात

येत आहे. विस्तृत माहित मागितली असता, अवलोकन करून अपीलकर्त्याने नेमकेपणाने कागदपत्रांची मागणी करणे आवश्यक होते. तसेच अपिलात मूळ अर्जापेखा अतिरिक्त माहितीची मागणी करणे व ती न मिळाल्याचे दाखवून अपूर्ण माहिती मिळाल्याची तक्रार करणे ही अपीलकर्ते श्री.दिलीप सिताराम देशपांडे यांची कृती योग्य नाही, याची समज त्यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.३०.१.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मच्छिंद्र आनंदराव घाडगे
मु.पो.देगाव(पाटेश्वर), ता.जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, सातारा, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत देगाव(पाटेश्वर ), ता.जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३९८ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मच्छिंद्र आनंदराव घाडगे
मु.पो.देगाव(पाटेश्वर), ता.जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, सातारा, जि.सातारा श्री.व्ही.एस.सिद

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत देगाव(पाटेश्वर ), ता.जि.सातारा श्री.ज.ल.निकाळजे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.११.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.११.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२३.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.५.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

ग्रामपंचायतीचे लेखा तपासणी अहवाल, ग्रामसभेच्या ठरावाच्या नकला आदी माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.मच्छिंद्र आनंदराव घाडगे यांनी केली.

श्री.घाडगे यांना मूळ अर्जानुसार मागितलेली माहिती देण्यात आली. सन २००२ पासूनचे लेखा तपासणी अहवाल मूळ अर्जात मागितलेले नाहीत व सन २००२ पासून लेखा तपासणी झालेली नाही, तसे श्री.घाडगे यांना लेखी कळविले. विविध निधींवरील विस्तृत आकडेवारी त्यांनी मागितली होती, ती कागदपत्रांवरून काढून देण्यात आली. त्यामुळे विलंब झाला, असे जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत देगाव(पाटेश्वर), ता.जि.सातारा श्री.ज.ल.निकाळजे यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

मिळालेल्या माहितीतील त्रुटी अथवा अपेक्षित अन्य माहिती याबाबत अपीलकर्त्याने आपल्याला कल्पना दिली असती तर पूर्तता करता आली असती, असे अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सातारा, जि.सातारा श्री.व्ही.एस.सिद यांनी नमूद केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकाऱ्यांनी उपलब्ध माहिती दिलेली आहे. काही मुद्दयांबात अधिक तपशील देणे आवश्यक होते(उदा.कॅशबुक तपासणीच्या शेऱ्यांची छायाप्रत). त्यानुसार ऊर्वरित माहितीची पूर्तता करून

आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु त्यानुसार माहिती प्राप्त झाली नसल्याची तक्रार श्री.घाडगे यांनी दि.१७.२.२००९ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. याबाबत जन माहिती अधिकाऱ्यांनी स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. अन्यथा ते कारवाईस पात्र ठरतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) आयोगाने दिलेल्या मौखिक अदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यास झालेल्या विलंबाच्या खुलाशासह माहिती देण्याबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत देगाव(पाटेश्वर), ता.जि.सातारा यांनी दि.२५.२.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

**पुणे**
**दि.१५.२.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. लक्ष्मण दादा कांबळे — अपीलकर्ता
रा. १८/११५, सिध्दार्थ हौ. सोसायटी, भाग्यरेखा
टॉकीज समोर, इचलकरंजी, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप निबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, श्री सिध्दार्थ हौसिंग सोसायटी, इचलकरंजी
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४३० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.१.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |
| | अपीलकर्ता | श्री. लक्ष्मण दादा कांबळे<br>रा. १८/११५, सिध्दार्थ को.ऑप. हौ. सोसायटी लि.,<br>भाग्यरेखा टॉकीज समोर, इचलकरंजी, ता.<br>हातकणंगले,<br>जि. कोल्हापूर |
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा | उप निबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले,<br>जि.कोल्हापूर तर्फे प्रतिनिधी श्री. बी.आर. डोंगळे |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.५.२००८ |
| ६ | प्रथम अपीलाची तारीख | दि. २.६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११.७.२००८ |
| ८ | माहिती-सामग्रीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

सिध्दार्थ हरिजन को. ऑप. हौसिंग सोसायटी लि., इचलकरंजी यांच्या आजी माजी अध्यक्षांकडून सन १९७५ ते १९८० च्या दरम्यान केलेल्या वारस नोंद ठरावाबाबतची माहिती मिळाली

नाही. पंधरा दिवसांत निःशुल्क माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, जि. कोल्हापूर यांनी दिल्यानंतरही दप्तर आपल्या ताब्यात नसल्याच्या कारणावरुन माहिती नाकारली जाते, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. लक्ष्मण दादा कांबळे यांनी केले.

सन १९७६ च्या ठरावाची नक्कल श्री. कांबळे यांनी मागितली आहे. माजी अध्यक्ष श्री. भिमराव के. कदम यांचे निधन झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबियांकडून दप्तर ताब्यात न मिळाल्यामुळे माहिती देता येत नसल्याचे हौसिंग सोसायटीचे अध्यक्ष श्री. अरविंद आबा कांबळे यांनी कळविले आहे. दप्तरी चार्जबाबत संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशा सूचना अध्यक्षांना अपिलीय प्राधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, जि. कोल्हापूर यांनी देऊनही श्री. अरविंद आबा कांबळे यांनी त्याबाबत कार्यवाही केली नाही, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, यांचे प्रतिनिधी श्री. बी. आर. डोंगळे यांनी अनुषंगिक कागदपत्रांसह केले.

संबंधित कागदपत्रांबाबत आठ दिवसांत पुढील कार्यवाही करावी. अपीलकर्त्यास माहिती निःशुल्क द्यावी व संस्थेचे अध्यक्ष श्री. अरविंद आबा कांबळे यांना शास्तीची जाणीव देऊन कार्यवाहीबाबतचा खुलासा मागवावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, जि. कोल्हापूर यांनी दि. ७.१.२००९ च्या पत्रान्वये श्री. अरविंद आबा कांबळे यांना कळविले असून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार प्रशासकीय कार्यवाही करण्याचेही सूचित केले आहे. त्याबाबतचा अहवाल अद्याप आयोगास प्राप्त झालेला नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलीय प्राधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, जि. कोल्हापूर यांनी सिध्दार्थ हरिजन को. ऑप. हौसिंग सोसायटी लि., इचलकरंजीचे अध्यक्ष श्री. अरविंद आबा कांबळे यांना दि. ७.१.२००९ रोजी लिहिलेल्या पत्रानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, जि. कोल्हापूर यांनी दि. ३०.१.२०१० पर्यंत आयोगास सादर करावा.

पुणे
दि. ११ .१.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सतीश उत्तम थोरात
मु. पो. कार्वे, ता. कराड, जि. सातारा — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप निबंधक,
सहकारी संस्था, कराड, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०० + ४२२ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. सतीश उत्तम थोरात
मु. पो. कार्वे. ता. कराड, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सातारा यांचेतर्फे प्रतिनिधी
श्रीमती एस.व्ही.गायकवाड, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था

**जन माहिती अधिकारी** तथा उप निबंधक,
सहकारी संस्था, कराड, जि. सातारा श्री. महेश कदम

| अपील क्रमांक | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ४०० / सातारा | १२.२.२००८ | १४.२.२००८ | १३.६.२००८ | १५.५.२००८ |
| ४२२ / सातारा | १२.२.२००८ | १०.४.२००८ | १९.३.२००८ | १५.५.२००८ |

८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

<u>विवेचन</u>

धानाई उपसा जलसिंचन योजना, कार्वे या संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याच्या कारणावरुन माहिती नाकारण्यात आली, म्हणून अपीलकर्ता श्री. सतीश उत्तम थोरात यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

धानाई उपसा जलसिंचन योजना, कार्वे ही संस्था कृष्णा सहकारी साखर कारखाना पुरस्कृत आहे. संस्थेला एकदाच सबसिडी दिली असून माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार ती सार्वजनिक प्राधिकरण ठरत नाही, असे संस्थेचे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, कराड व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा यांनाही कळविले. त्यानंतर भूविकास बँकेकडून माहिती घेऊन अपीलकर्त्यास दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, कराड श्री. महेश कदम यांनी केले.

धानाई उपसा जलसिंचन योजना, कार्वे या संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (एच) मधील तरतुदी लागू होण्याबाबत संस्था, अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी नेमके पुरावे सादर केलेले नाहीत, ते सादर करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

१. अपिल निकाली काढण्यात येत आहेत.

२. धानाई उपसा जलसिंचन योजना संस्था, कार्वे, अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (एच) मधील तरतुदी लागू होण्याबाबतचे नेमके पुरावे दि. १०.२.२०१० पर्यंत आयोगास सादर करावे.

पुणे
दि. ३१.१.२०१०

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सुरेश गणपत पवार
बंदी क्र.सी/३१५२, सर्कल नं.५/२,
कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह, कळंबा, कोल्हापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** मुख्य लेखाधिकारी, पुणे महानगरपालिका, पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** जनसंपर्क अधिकारी, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **४०० / कोल्हापूर** |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.१.२००९ |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. सुरेश गणपत पवार यांनी मागितलेली माहिती मिळाली नसल्याचे राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जात नमूद केले आहे. तथापि माहिती मागणीचा मूळ अर्ज, जन माहिती अधिकारी तथा जनसंपर्क अधिकारी, पुणे महानगरपालिका, पुणे यांचे उत्तर, प्रथम अपिलाचा अर्ज आदी कोणतीही कागदपत्रे सोबत जोडलेली नाहीत. तसेच "विशेष अपील निर्गत कार्यक्रम" व आयोगापुढील सुनावणी यावेळी संबंधित कोणीही उपस्थित नव्हते.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५-१-२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. नसीरखान ईस्माईल खान
५९९, उत्तर सदर बझार, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता,
श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार
रूग्णालय, सोलापूर — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,
श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रूग्णालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०२ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.१.२००९ |

३. उपस्थित

**अपीलकर्ता** - श्री. नसीरखान ईस्माईल खान
५९९, उत्तर सदर बझार, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता,
श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रूग्णालय, सोलापूर
डॉ. अे. डी. शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रूग्णालय, सोलापूर
श्री. गो.बा.सवाई

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.८.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.२.२००७ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपल्याला विलंबाने व चुकीची माहिती दिली. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्यावर शिक्कामोर्तब केले. प्रथम अपील केल्यानंतर आधी नाकारलेली कार्यालयीन टिपणीची प्रत दिली, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. नसीर ईस्माईल खान यांनी केले.

संबंधित विषयात कार्यवाही चालू असल्याने टिप्पणीची प्रत वगळता सर्व माहिती मुदतीत देण्यात आली. नंतर टिप्पणीची प्रतही दिली. श्री. खान यांना देण्यात आलेली आगावू वेतनवाढ कार्यालयाने रद्द ठरविल्यानंतर श्री. खान यांनी चार ते पाच वेळा त्या संदर्भात माहितीच्या अधिकारात अर्ज दिले असून कामगार न्यायालयात दावा दाखला केला आहे. एकाच विषयाबाबत दोन-दोन ठिकाणी तक्रारी / दावे करणे हे श्री. खान त्रास देण्यासाठी करीत आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रूग्णालय, सोलापूर श्री. गो.बा. सवाई व अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता, श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रूग्णालय, सोलापूर डॉ.अे.डी. शिंदे यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांनी माहिती नाकारलेली नाही. विहित मुदतीत योग्य कार्यवाही केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. ०८.१.२०१०

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. किरण अरूण भोसले
मु. पो. अकलूज, गणेशनगर ता. माळशिरस, **अपीलकर्ता**
जि. सोलापूर

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
माळशिरस, ता. माळशिरस, जि. सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
ता माळशिरस, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०३+५५३/ सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००८ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. किरण अरूण भोसले<br>मु. पो. अकलूज, गणेशनगर, ता. माळशिरस,<br>जि. सोलापूर |
| | **अपिलीय प्राधिकारी तथा** | तहसीलदार, माळशिरस, जि. सोलापूर<br>श्री. वैभव विठ्ठलराव नावडकर |
| | **जन माहिती अधिकारी** | निवासी नायब तहसीलदार, ता माळशिरस, जि. सोलापूर<br>श्री. श्रीकांत महादेव पोरे |

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ४०३/सोलापूर | ९.११.२००६ | २१.१२.२००६ | -- | ३.४.२००७ |
| ५५३/सोलापूर | ३.४.२००७ | -- | ४.५.२००७ | -- |

| | |
|---|---|
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>सुधारीत आदेश</u>

**<u>वाचा :- आयोगाचा समक्रमांकाचा आदेश २८.१२.२००९</u>**

श्री किरण अरूण भोसले यांच्या अपिलावर राज्य माहिती आयोगाने पारित केलेल्या दि.२८.१२.२००९ च्या आदेशामधील अपिल क्र. २ मध्ये आयोगाच्या आदेशानुसार माहिती देण्याबाबतची कार्यवाही न केल्याबद्दल तहसीलदार माळशिरस श्री. वैभव विठ्ठलराव नावडकर यांना रू. २५०००/- शास्ती करण्यात आली आहे.या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत स्पष्टीकरण देणारे निवेदन श्री. नावडकर यांनी २५.१.२०१० च्या पत्रान्वये आयोगाला सादर केले आहे.

श्री. भोसले यांच्या अपिलांच्या अनुषंगाने राज्य माहिती आयोगाच्या आदेशानुसार मूळ अभिलेखात घेण्यात आलेल्या बेकायदेशीर नोंदी रद्द करणे गरजेचे असल्याने उपविभागीय अधिकारी, माळशिरस विभाग, अकलूज यांना दि. १.१२.२००८ रोजी कळवून त्याची प्रत अपिलकर्त्यास पाठविली व ७/१२ उतारे बिनशेती आदेशाचे नोंदीबाबत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या कलम १५५ नुसार मौजे अकलूज येथील स. नं. ७८ पैकी चे प्लॉट नं. ३६, ३७ व ५५ चे मूळ ७/१२ उता-याच्या धारणा प्रकार खालसा नोंदी घेण्याबाबत दि.३१.१२.२००९ रोजी आदेश दिले अर्धन्यायिक प्रकरणांची संख्या विचारात घेता प्रकरणात सुनावणी घेउन निर्णय देण्यास विलंब झाला. असे निवेदनात नमूद केले असून विलंबाबाबत दिलगिरी व्यक्त केली आहे. सोबत पूरक कागदपत्रे सादर केली असून दंडात्मक कारवाई रद्द करण्याची विनंती केली आहे.

उपरोक्त निवेदन पाहता श्री नावडकर यांनी माहितीच्या अनुषंगाने अपिलकर्त्याचा मूळ प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासकीय कार्यवाही ही केली आहे, हे लक्षात घेता श्री. नावडकर, तहसीलदार यांना लावण्यात आलेली शास्ती रू.२५०००/- रद्द करण्याची विनंती मान्य करण्यात येत असून त्यानुसार आयोगाचा सुधारित आदेश पुढील प्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

१) वरील अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

२) तहसीलदार, माळशिरस श्री. वैभव विठ्ठलराव नावडकर यांना दि. २८.१२.२००९ च्या आदेशान्वये

करण्यात आलेली शास्ती रू २५०००/- रद्द करण्यात येत आहे. मात्र विहित मुदतीत अहवाल सादर करण्याची समज देण्यात येत आहे.

पुणे
दि. ३०.९.२०१०

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. गोपीनाथ दिनकर मुळीक — अपीलकर्ता
सि.स.नं.१४६४, बी वॉर्ड, मंगळवार पेठ,
सनगर गल्ली, कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शहर अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०५ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.१.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. गोपीनाथ दिनकर मुळीक<br>सि.स.नं.१४६४, बी वॉर्ड, मंगळवार पेठ,<br>सनगर गल्ली, कोल्हापूर |
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा | आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर<br>श्री. गणेश एन. देशमुख |
| | **जन माहिती अधिकारी** तथा | शहर अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका,<br>कोल्हापूर श्री. एन.एस.सरनोबत |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.६.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.७.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.८.२००५ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

नियमबाह्य व अतिक्रमण करुन केलेले विनापरवाना बांधकाम पाडण्याबाबत आपण तक्रार करुन चार वर्षे झाली तरी त्यानुसार कारवाई केली जात नाही, ती कारवाई लवकर व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. गोपीनाथ दिनकरराव मुळीक यांनी केली.

श्री. मुळीक यांनी केलेली मागणी माहितीची नसून प्रशासकीय कार्यवाहीची आहे. जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर व अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांनी त्या अनुषंगाने कार्यवाही करण्याचा प्रयत्न केला. तथापि समाईक बांधकाम असून परवानगीने केलेले आहे. त्याबाबत उभय बाजूंना एकत्र आणून कार्यवाही करण्यात येत आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. एन.एस.सरनोबत यांनी केले. अपीलकर्त्याचा विषय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. ७ .१.२०१०

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोक रामचंद्र पांढरवळे
१३३/१, अ-ई, सदरबाजार, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,
पुणे-१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०६ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अशोक रामचंद्र पांढरवळे
१३३/१, अ-ई, सदरबाजार, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि.कोल्हापूर
प्रतिनिधी श्री.व्ही.एम.मंगल

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.८.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.४.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.५.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे दि.७.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

एप्रिल २००८ मध्ये आपण मागितलेली माहिती ऑक्टोबर २००८ मध्ये व तीही अपुरी दिली. त्याबद्दल संबंधितांवर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.अशोक रामचंद्र पांढरवळे यांनी केली.

श्री.पांढरवळे यांनी सदरबाजार सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या संदर्भातील सन १९५८ पासूनची माहिती मागितली होती. परंतु विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालय सन १९८१ पासून सुरू झाले आहे. त्यापूर्वीची माहिती विभागीय सहनिबंधक, सहकार यांच्याकडून उपलब्ध करून घेण्याबाबत त्यांना कळविले व अन्य माहिती दिली. श्री.पांढरवळे यांनी विभागीय समाजकल्याण अधिकारी, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे अर्ज केला होता. तेथून तो आपल्या कार्यालयाकडे पाठविला गेला. अर्जदाराचा पत्ता त्यावर नसल्यामुळे माहिती अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या कार्यालयास पाठविली व अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या मार्फत ती माहिती अपीलकर्त्यास देण्यात आली, असे निवेदन जन माहिती अधिकाऱ्यांचे प्रतिनिधी श्री.व्ही.एम.मंगल यांनी केले. तसेच श्री.पांढरवळे यांना वेळोवेळी दिलेली माहिती व पत्रव्यवहार याच्या प्रती त्यांनी

सादर केल्या. या बाबी लक्षात घेता अपीलकर्त्याची विलंबाबातची तक्रार अमान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १५ .१.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. गणपत धनवडे
मु.पो. नुने, ता. जि. सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप विभागीय अधिकारी, सातारा उपविभाग, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.५.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** — श्री. गणपत धनवडे, मु.पो. नुने, ता. जि. सातारा<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा — अप्पर जिल्हाधिकारी, सातारा, श्री. वसंतराव देशमाने<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा — उप विभागीय अधिकारी, सातारा उपविभाग, सातारा, तर्फे प्रतिनिधी स्वीय सहाय्यक श्री. सतीश जाधव | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.४.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१.५.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जमिनीचे हक्क नोंदणी पुनर्विलोकन प्रकरण निकालावर ठेवले असताना नंतर पुढील तारखा दिल्या व चुकीचा रोजनामा केला. प्रकरण प्रलंबित ठेवले, असे का केले, याची विचारणा अपीलकर्ता श्री. गणपत धनवडे यांनी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सातारा उपविभाग, सातारा यांच्याकडे केली होती. त्याबाबतची माहिती व पुरावे न मिळाल्याची तक्रार श्री. धनवडे यांनी केली.

संबंधित प्रकरण निकालावर ठेवले होते, हा अपीलकर्त्याचा काल्पनिक मुद्दा आहे. केलेली कार्यवाही योग्य असून श्री. धनवडे यांनी केलेली विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार 'माहिती' या संज्ञेमध्ये समाविष्ट होत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सातारा उपविभाग, सातारा श्री. रामदास जगताप यांनी केले. संबंधित प्रकरणाच्या कामकाजाला उभय पक्षकार उपस्थित होते, त्यांच्यासमोर निर्णय दिला. रोजनाम्याची नक्कल व सर्व माहिती श्री. धनवडे यांना देण्यात आली असून निर्णय-प्रक्रियेविषयी तक्रार असल्यास ते स्वतंत्र अर्ज करु शकतात, असे स्पष्ट करण्यात आले, असे अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा श्री. वसंतराव देशमाने यांनी नमूद केले. उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. २२.१.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. संदिप शिवाजीराव कुंभार
प्लॉट नं.३१, शिंदे कॉलनी, उचगांव,
ता. करवीर, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४११/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. संदिप शिवाजीराव कुंभार
प्लॉट नं.३१, शिंदे कॉलनी, उचगांव,
ता. करवीर, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, कोल्हापूर तर्फे प्रतिनिधी
अधीक्षक श्री. भालचंद्र विनायक माने

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. शरद शंकर गिरीगोसावी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७.५.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ९.७.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

ज्ञानगंगा हायस्कूल जाधववाडी, कोल्हापूर या शाळेच्या संदर्भातील आपण मागितलेली माहिती शिक्षण अधिकारी कार्यालयात असूनही जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी दिली नाही. शाळेच्या मुख्याध्यापकांना त्यांनी ही माहिती देण्यास कळविले. मुख्याध्यापकांनी अपूर्ण माहिती दिली व ती प्रमाणित केली नाही. मात्र हीच माहिती शिक्षण उप संचालक कार्यालयाकडून आपल्याला मिळाली. या माहितीत फेरफार केला असण्याची शक्यता असल्यामुळे दिली नाही, म्हणून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. संदिप शिवाजीराव कुंभार यांनी केली.

माहिती देण्याबाबत शाळेच्या मुख्याध्यापकांना कळविले होते. त्यांनी दिलेली माहिती श्री. कुंभार यांना देण्यात आली. त्यांच्या मते ती अपूर्ण आहे. मात्र संस्था व श्री. कुंभार यांच्यात वाद असून पोलिसांकडे तक्रारी दाखल आहेत. उपलब्ध सर्व माहिती दिल्याचे मुख्याध्यापकांचे म्हणणे आहे, असे जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. शरद शंकर गिरीगोसावी यांनी नमूद केले.

अपीलकर्ता श्री. कुंभार संस्थेतील लिपिक असून त्यांनी संस्थेची कागदपत्रे चोरुन नेली असून त्यातील काही कागदपत्रे पोलिस निरीक्षकांसमोर आम्हांला परत दिली. परंतु बरीच कागदपत्रे अद्याप दिली नाही, त्यामुळे त्यांच्याविरुध्द न्यायालयात फौजदारी दावा दाखल केला आहे. मागितलेल्या माहितीची कागदपत्रे त्यांच्याकडे असण्याची शक्यता आहे, असे प्रतिपादन शाळेचे मुख्याध्यापक श्री. डी. बी. बेलेकर यांनी अनुषंगिक कागदपत्रांसह केले.

उभय बाजूंमधील वाद व माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याचे निवेदन लक्षात घेता विलंबाबाबतची तक्रार अमान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ११.१.२०१०

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. इमतियाज महिबुब बागवान — अपीलकर्ता
२६६, गुरूवार पेठ, भाजी मार्केट, कराड
जि. सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, कराड नगरपरिषद, कराड
जि. सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता, बांधकाम विभाग, कराड
नगरपरिषद, कराड जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४१२ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.३.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** — श्री. इमतियाज महिबुब बागवान
२६६, गुरूवार पेठ, भाजी मार्केट, कराड
जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा — मुख्याधिकारी, कराड नगरपरिषद, कराड
जि. सातारा श्री. के. एन. कुंभार

**जन माहिती अधिकारी** तथा — नगर अभियंता, बांधकाम विभाग, कराड
नगरपरिषद, कराड जि. सातारा
श्री. ए. एन. मुल्ला

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | १३.५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | १२.६.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. | -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | ९.७.२००८ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

जुम्मा मशिद मनोरे ट्रस्टने ऐतिहासिक इमारत पाडण्याच्या संदर्भात सन १९९६ मध्ये मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या दाव्यात नगरपरिषदेने दाखल केलेले प्रतिज्ञापत्र आदी कागदपत्रांच्या प्रती वारंवार मागणी करूनही जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, कराड नगरपरिषद, कराड यांनी दिल्या नाहीत. संबंधित मिळकतीच्या संदर्भातील क्षेत्र आदि दर्शविणारा नकाशा करून देण्याची मागणी मान्य केली नाही. जाणीवपूर्वक ही कागदपत्रे दिली जात नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. इमतियाज महिबुब बागवान यांनी केली.

वकिलांकडून ही कागदपत्रे उपलब्ध करण्याचा प्रयत्न केला. न मिळाल्यामुळे उच्च न्यायालयाकडून ती प्राप्त करून घेण्यासाठी न्यायालयाकडे मागणी केली. परंतु कागदपत्रे नाश केली असल्याचे न्यायालयाने कळविले, त्यामुळे देता आली नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, कराड नगरपरिषद, कराड श्री. ए. एन. मुल्ला यांनी केले. नगरपरिषदेच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या व उच्च न्यायालयाकडून प्राप्त झालेल्या कागदपत्रांच्या प्रती श्री. बागवान यांना दिल्या. माहिती मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे त्यातून स्पष्ट होते. तसेच विशिष्ट स्वरूपाचा नकाशा तयार करून द्यावा, ही मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, कराड नगरपरिषद, कराड श्री. के. एन. कुंभार यांनी केले.

नगरपरिषदने उच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्राची प्रत नगरपरिषदेकडेच उपलब्ध नाही, हे मान्य करता येणार नाही. संबंधित प्रत अपीलकर्त्यास पंधरा दिवसांत उपलब्ध करून द्यावी, त्याप्रमाणे कार्यवाही न झाल्यास संबंधित अधिकारी दंडात्मक कारवाईस पात्र ठरतील, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार नगरपरिषदेच्या वकिलांची समक्ष भेट घेतली असता नगरपरिषदेच्या प्रतिज्ञापत्राची प्रत त्यांनी दिली. ती दि. १.४.२००९ रोजी श्री. बागवान यांना देण्यात आली. त्यानंतर याचिकेच्या संदर्भातील सर्व कागदपत्रे त्यांच्याकडून उपलब्ध झाली. त्यांच्या प्रती दि. ९.४.२००४ च्या पत्रान्वये त्यांना पाठविण्यात आल्या, असा अहवाल जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, बांधकाम विभाग,

कराड नगरपरिषद, कराड श्री. ए.एन.मुल्ला यांनी आयोगाला सादर केला. माहिती देण्याबाबत तत्परतेची भूमिका असती, तर हीच कार्यवाही श्री. मुल्ला यापूर्वीही करू शकले असते. माहिती देण्याबाबत अधिक गांभीर्याने व जबाबदारीने कार्यवाही करण्याची समज जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, बांधकाम विभाग, कराड नगरपरिषद, कराड श्री. ए. एन. मुल्ला यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २७.१.२०१०**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री. अविनाश विलासराव अंबपकर
घ. नं. २६०९, डी - वॉर्ड,
दुसरी डांगे गल्ली, जुना बुधवार
कोल्हापूर

..... **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
२०४/ख/ई, शाहुपूरी, भू-विकास बँक इमारत, ३रा मजला, हॉटेल पर्ल जवळ,
कोल्हापूर

..... **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** अवसायक व सहाय्यक निबंधक,
दि रवि को-ऑप बँक लि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४१३ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दिनांक ६.१.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. अविनाश विलासराव अंबपकर<br>घ. नं. २६०९, डी - वॉर्ड,<br>दुसरी डांगे गल्ली, जुना बुधवार,<br>कोल्हापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,<br>२०४/ख/ई, शाहुपूरी, भू-विकास बँक इमारत, ३रा मजला, हॉटेल पर्ल जवळ,<br>कोल्हापूर | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक १६.५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक २९.५.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक २७.६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक १.८.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** मूळ माहिती अर्ज (जोडपत्र ‘अ’) ची प्रत सोबत जोडली आहे. | |

# सुधारित आदेश

## वाचा :- आयोगाचा समक्रमांकाचा आदेश दिनांक:१२.११.२००९

श्री. अविनाश विलासराव अंबपकर यांच्या अपिलावर राज्य माहिती आयोगाने पारित केलेल्या दिनांक १२.११.२००९ च्या आदेशामधील अ.क्र.२ मध्ये जन माहिती अधिकारी तथा दि रवि कॉ-ऑप. बँक, कोल्हापूरचे अवसायक व सहायक निबंधक श्री. एस. एस. कुंभार यांनी अपीलकर्त्यास माहिती विहित मुदतीतच नव्हे, तर आयोगाच्या आदेशानंतरही न पुरविल्याने त्यांना रु.२५,०००/- शास्ती करण्यात आली आहे.

श्री. अंबपकर यांच्या दिनांक १६.५.२००८ रोजीच्या माहिती अर्जास दिनांक २९.५.२००८ रोजी उत्तर दिले असून दिनांक १४.६.२००८ रोजी सहायक निबंधक, सहकारी संस्था कोल्हापूर अधिन जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर या पदावर बदली झाल्याने पूरक कागदपत्रांसह दिनांक २.१.२०१० रोजीचे निवेदन श्री. कुंभार यांनी आयोगास सादर केले. आपली बाजू विचारात घेऊन शास्तीची कारवाई रद्द करावी, अशी विनंती त्यांनी आयोगास केली आहे.

तसेच विद्यमान अवसायक, दि रवि को-ऑप बँक लि. कोल्हापूर यांनी दिनांक ६.१.२००९ रोजी सुनावणी दरम्यान दिलेल्या आदेशानुसार अपीलकर्त्यास शुल्क भरण्यास कळविले परंतू, अपीलकर्त्याने शुल्क भरले नाही, तरी सुध्दा श्री.अंबपकर दिनांक २८.१.२००९ रोजी बँकेत आल्यानंतर त्यांना नि:शुल्क माहिती दिल्याची पोच अवसायक, दि रवि को-ऑप. बँक यांनी पूरक कागदपत्रांसह दिनांक १.१.२०१० रोजीच्या निवेदनाद्वारे आयोगास सादर केली.

उपरोक्त निवेदने विचारात घेऊन श्री. कुंभार यांची शास्ती रु.२५,०००/- रद्द करण्याची विनंती मान्य करण्यात येत असून त्यानुसार आयोगाचा सुधारित आदेश पुढील प्रमाणे:

# आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी तथा दि रवि को-ऑप. बँक चे अवसायक व सहायक निबंधक श्री. एस. एस. कुंभार यांना दिनांक १२.११.२००९ च्या आदेशान्वये करण्यात आलेली शास्ती रु.२५,०००/- रद्द करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ, पुणे

पुणे
दिनांक: ३० - ०१-२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.इम्तियाज महिबुब बागवान
२६६, गुरूवार पेठ, भाजी मार्केट, कराउ, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पाणचक्की, औरंगाबाद उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालय अधीक्षक,
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पाणचक्की, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४१३ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.इम्तियाज महिबुब बागवान
२६६, गुरूवार पेठ, भाजी मार्केट, कराड, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पाणचक्की, औरंगाबाद श्री.एस.एस.अली कादरी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालय अधीक्षक,
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पाणचक्की, औरंगाबाद श्री.शेख जफर शेख इब्राहिम

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२१.२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.५.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.४.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि.३.५.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२३.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.५.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

धर्मादाय आयुक्तांकडे दावा प्रलंबित असून विषयांकित प्रकरणातील सर्व कागदपत्रे महाराष्ट्र वक्फ मंडळाकडे पाठविल्याचे धर्मादाय आयुक्तांनी कळविले असूनही विहित मुदतीत माहिती दिली नाही. आता कागदपत्रे मिळाली असून विलंबाबद्दल जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पाणचक्की, औरंगाबाद यांच्यावर कारवाई व्हावी अशी मागणी अपीलकर्ता श्री.इम्तियाज महिबुब बागवान यांनी केली. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पाणचक्की, औरंगाबाद श्री.शेख जफर शेख इब्राहिम सौदी अरेबियाला गेले आहेत. तथापि सहधर्मादाय आयुक्त, सातारा यांच्याकडून वक्फ मंडळाकडे वर्ग केलेल्या संचिकेत श्री.बागवान यांनी मागितलेली कागदपत्रे उपलब्ध नाहीत. तसे त्यांना विहित मुदतीत कळविले होते. याबाबत वेळोवेळी पत्रव्यवहार केला असून उपलब्ध होताच माहिती दिली, असे जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पाणचक्की, औरंगाबाद श्री.एस.एसअली कादरी यांनी पूरक कागदपत्रांसह प्रतिपादन केले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०.१.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. दिगंबर शंकर गिरमे
४२२, कसबा पेठ,
पुणे-११

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक पोलीस आयुक्त,
पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४१५/पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | २७.०५.२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०६.०५.२००६ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३१.०५.२००६ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१५.०९.२००६ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.- |
| ७ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. दिगंबर शंकर गिरमे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलाचा समावेश दि.२६.०५.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मध्ये होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेल्या कागदपत्रावरुन अपीलकर्त्यास दि.३१.०५.२००६ रोजी माहिती दिल्याचे दिसून येते.

तसेच श्री.गिरमे यांच्या याच विषयासंदर्भातील अन्य अपीलात यापूर्वी आयोगाने निर्णय दिलेला आहे. सदरहू निर्णय या अपिलात देखील लागू होतो.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दिनांक : २५/०१/२०१०